**CNR NO.MHSO060004072021**

**विशेष दरखास्त क्र. १४/२०२१**

**वसंत पिसे**

**वि.**

**कांतीलाल चव्हाण**

## नि. १६ वरील आदेश
## (घोषित दि. ०६/१२/२०२२)

प्रस्तुतचा अर्ज ऋणको यांनी दाखल केला असून त्यांचे विरुध्द प्रस्तुतची दरखास्त एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करुन दाखल केलेले म्हणणे पटलावर घेण्याची विनंती करण्यात आलेली आहे. ऋणको यांनी असे नमूद केले की, त्यांच्या मुलाला कोरोना कालावधीमध्ये म्युकरमायक्रोसीस आजार झाला होता तसेच इतर घरगुती अडचणीमुळे ते न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करु शकलेले नाहीत. प्रस्तुत दरखास्तमध्ये त्यांना म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक असून एकतर्फा आदेश रद्द न केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२. धनकोतर्फे **नि.क्र.१८** व्दारे म्हणणे सादर करुन अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. दरखास्त दाखल झाल्यानंतर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम २२ प्रमाणे ऋणको यांना नोटीस तामील होवूनदेखील ते हजर झालेले नाहीत. दरखास्त ही रक्कम वसुलीची असून ऋणको यांनी रक्कम जमा न केल्यामुळे त्यांची जंगम मालमत्ता जप्त करण्याबाबत आदेश पारीत झालेला आहे. आपली मिळकत जप्त होणार हे लक्षात आल्यानंतर ऋणको यांनी प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. अर्जातील सर्व कारणे ही खोटी असून अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करणे झाल्यास रु.५०,०००/- दंड लावण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३. प्रस्तुत दरखास्त ही रक्कम रु.५,००,०००/- व्याजासह वसुल होवून मिळणेकरीता दाखल करण्यात आलेली असून नोटीस तामील झाल्यानंतरही ऋणको

हजर न झाल्याने प्रस्तुतची दरखास्त एकतर्फा चालविण्याबाबत आदेश पारीत झालेला आहे. तद्नंतर ऋणको यांनी रक्कम जमा न केल्यामुळे त्यांची मालमत्ता जप्त करणेकामी आदेश पारीत झालेला आहे. ज्यानंतर ऋणकोने प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे.

०४. प्रस्तुत दरखास्तीची परिस्थीती लक्षात घेता ऋणको रक्कम वसुलीची दरखास्त टाळण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. असे जरी असले तरीही न्यायदानाच्यादृष्टीने म्हणणे मांडण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वाला धरुन होईल. ऋणकोतर्फे अर्जात नमुद करण्यात आलेल्या कारणांच्या पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल करण्यात आलेला नाही. तरी न्यायदानाच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन ऋणको यांना म्हणणे मांडण्यांची संधी देणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे. ऋणको यांनी केलेल्या विलंबामुळे दरखास्तीचे कामकाज लांबलेले आहे त्यामुळे धनको खर्च मिळणेस पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

1. अर्ज खर्च रु.१,०००/- लावून मंजूर करण्यात आला.
2. ऋणकोविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व ऋणकोतर्फे दाखल म्हणणे खर्च दिल्यानंतर पटलावर घेण्यात यावे.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.12.06 17:33:22 +0530

दिनांक : ०६/१२/२०२२

(ए. ए. खंडाळे. )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
पंढरपूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| A | Name of the Stenographer | : Shirsikar V. G. |
| b | Court | : 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur. |
| c | Date of Order | : 06/12/2022 |
| d | Order signed by P.O. on | : 06/12/2022 |
| e | Order uploaded on | : 06/12/2022 |